- In compliance with the above circulars, electronic copies of the Notice of the AGM and Annual Report 2024 will be sent to all the shareholders whose email addresses are registered with the Company/Depository Participant(s) and **the Company will not send physical copies of AGM Notice and Annual Report to the Shareholders.**
- Shareholders holding shares in dematerialized mode and whose email ids are not registered are requested to register their email addresses and mobile numbers with their relevant depositories through their depositary participants.
- Shareholders holding shares in physical mode are requested to either dematerialise their holdings or furnish relevant Investor Service Request Forms (ISR-1 and ISR-2) along with relevant ID and address documents, for registering their email addresses and mobile numbers and to update their bank details for receiving dividend, with the Company's Registrar and Share Transfer Agent, **MUFG Intime India Private Limited** (formerly Known as 'Link Intime India Private Limited'). The above forms are available on the Company's RTA's website at https://in.mpms.mufg.com/
- Shareholders holding shares in dematerialized mode are requested to update their bank / ECS details, where applicable, for receiving dividend through their depository participants.
- All shareholders are requested to update their KYC details at the earliest, if not done already.

Shareholders will have an opportunity to cast their vote remotely prior to the AGM or during the AGM on the business as set forth in the Notice of the AGM, through electronic voting system. The manner of voting remotely prior to the AGM or during the AGM for shareholders holding shares in dematerialized mode, physical mode and for shareholders who have not registered their email addresses will be provided in the Notice to the shareholders.

The notice convening the 75th AGM and Annual Report 2024 will also be made available on the Company's website, at www.flexibles.huhtamaki.in, the websites of Stock Exchanges at www.bseindia.com and www.nseindia.com and on the NSDL's website at www.evoting.nsdl.com.

In terms of provisions of Section 91 of Companies Act, 2013 and applicable rules framed thereunder, the Company has fixed **Thursday, April 24, 2025**, as the **Record Date** for the purpose of payment of dividend for the financial year ended December 31, 2024, as recommended by the Board. Once approved at the AGM, the dividend will be paid within 30 days of the AGM, to those members who are KYC compliant and whose names appear in the Register of Members of the Company as on Thursday, April 24, 2025.

Pursuant to the provisions of Income Tax Act, 1961 ("the IT Act"), as amended by and read with the provisions of Finance Act, 2020, w.e.f. April 01, 2020, dividend income is taxable in the hands of members and the Company is required to deduct tax at source (TDS) from dividend paid to the members at applicable rates. **The shareholders are requested to update their valid PAN linked with Aadhaar with the R&T Agents/Depository Participant.** No TDS would be deducted if the dividend income to a resident Individual shareholder during FY 2025-26 does not exceed ₹ 10,000/. An email in this regard has already been sent to the relevant shareholders.

SEBI, vide its circular dated November 3, 2021 (subsequently amended by circulars dated December 14, 2021, March 16, 2023 and November 17, 2023) has mandated that the security holders (holding securities in physical form), whose folio(s) do not have PAN or Choice of Nomination or Contact Details or Mobile Number or Bank Account Details or Specimen Signature updated, shall be eligible for any payment including dividend, interest or redemption in respect of such folios, only through electronic mode with effect from April 1, 2024, upon their furnishing all the aforesaid details in entirety.

The above information is being issued for information and benefit of the members of the Company and in compliance with the MCA Circulars.

By Order of the Board
For Huhtamaki India Limited

April 9, 2025 Abhijaat Sinha
Mumbai Company Secretary

## Central Bank of India — Jalgaon Regional Office — Possession Notice

सेन्ट्रल बैंक ऑफ इंडिया
Central Bank of India
1911 से आपके लिए "केंद्रित" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

**Jalgaon Regional Office**
(For Immovable property Under rule 8[1]of security interest [Enforcement] Rules 2002)
**Possession Notice**

**WHEREAS,** The undersigned being the Authorised Officer of the Central Bank of India, under the Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act 2002(54 of 2002) and in exercise of powers conferred under Section 13(2) read with rule 3 of the Security Interest (Enforcement) Rules, 2002 issued a demand notice, calling upon the respective borrowers as mentioned below to repay the amount mentioned in the respective demand notice and interest thereon within 60 days from the date of receipt of the said notice.

The borrower/s having failed to repay the amount, notice is hereby given to the borrower/s and the public in general that the undersigned has taken possession of the property described herein below in exercise of powers conferred on him/her under subsection (4) of section 13 of the Act the said Act read with rule 8 of the security interest (Enforcement)Rule 2002 on the respective dates mentioned below. The borrower in particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to charge of the Central Bank of India, for an amount mentioned in demand notice and interest thereon. The borrower's attention is invited to provisions of sub section (8) of the section 13 of the Act, in respect of the time available, to redeem the Secured assets.

| Sr. No. | Name of the Borrowers | Branch Name | Details of Property | Date of Demand Notice & Amount Due as per Notice | Date of Possession |
|---|---|---|---|---|---|
| 01 | **Borrowers - Ravindra Dayaram Sonawane** | **Central Bank of India Branch- Hated BK. Chopda** | All that Part and Parcel of the land and building Galwade Grampanchayat House no.187/A Area-850.50 Sq. Ft., Post- Hated Bk. Taluka-Chopda Dist. Jalgaon. **Boundries - East :** River, **West :** Road, **North:** G.P. House No.186, **South:** G.P. House No.188 | **Date : 30.11.2024, Rs.4,90,220.85/-** (Rupees Four Lakh Ninety thousand Two Hundred Twenty and Eighty Five Paisa only) | 02.04.2025 |
| 02 | **Borrowers - Sushil Vinayak Sonawane** | **Central Bank of India Branch- Hated BK. Chopda** | All that Part and Parcel of the property/House/Flat at Grampanchayat House No-109 and City Survey No-87 Area:-431 Sq.Ft. Located at: HATED BK Village, Taluka- Chopda, Dist. Jalgaon **: Boundries - East :** Road, **West :** C.S.No.-839, **North:** C.S.No.-838, **South:** C.S.No.-836 | **Date : 30.11.2024, Rs.6,14,429.47/-** (Rupees Six Lakh Fourteen thousand Four Hundred Twenty Nine and Forty Seven Paisa only) | 02.04.2025 |

**Date : 09.04.2025**
**Place : Jalgaon**

**Authorised Officer/ Chief Manager**
**CENTRAL BANK OF INDIA**

# पर्यावरणरक्षक भगवान महावीर

**साऱ्या जगाला 'अहिंसा परमो धर्मः' व 'जिओ और जिने दो' या सिद्धांतांतून पर्यावरणरक्षण आणि संवर्धन कसे करता येईल, हे सांगणारे जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त...**

**डॉ. रिता शेटिया**


पर्यावरणीय प्रदूषण आणि पर्यावरणीय असंतुलनाची समस्या मानवी अस्तित्वासाठी एक आव्हान आहे. माणूस हा पर्यावरणाचा महत्त्वाचा घटक. त्याच्या शरीरात विकार निर्माण झाले तर संपूर्ण वातावरण दूषित होते. स्वच्छ पर्यावरणासाठी मानवाचे निरोगी राहणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने भगवान महावीर यांच्या महत्त्वाच्या तीन सिद्धान्तामध्ये पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन यांचा विचार आपल्याला मिळतो, जो आपल्यासाठी मार्गदर्शक आहे.

### अहिंसा परमो धर्म

अहिंसा हे पर्यावरणरक्षणाचे अद्वितीय शास्त्र आहे. संपूर्ण जगाला पंचशील (सत्य, अहिंसा, अपरिग्रह, अनेकांतवाद आणि क्षमा) ही तत्त्वे देणाऱ्या महावीरांनी केवळ मानवाचेच नव्हे, तर संपूर्ण सजीवसृष्टीचे, समाजाचे कल्याण आणि विश्वशांतीचा मार्ग प्रशस्त केला होता. सजीव आणि निर्जीव वस्तूंनी मिळून बनलेल्या या सृष्टीत माती, पाणी, अग्नी, वायू आणि वनस्पती या सर्व निर्जीव घटकांना जीवन आहे, असे म्हटले होते; त्यामुळे त्यांचे अस्तित्व नाकारता कामा नये. त्यांचे अस्तित्व नाकारणे म्हणजे आपले स्वतःचे अस्तित्व नाकारणे होय. जंगम किंवा अचल, दृश्य-अदृश्य अशा सर्व सजीवांचे अस्तित्व मान्य करणारा मनुष्यच पर्यावरण आणि मानवजातीच्या रक्षणाचा विचार करू शकतो. अहिंसेचा सिद्धांत केवळ आत्मशुद्धीसाठी नाही तर पर्यावरणाच्या शुद्धीकरणासाठीही आहे.

### शाकाहाराचे महत्त्व

शाकाहार हा अहिंसेच्या तत्त्वाचा एक व्यावहारिक प्रकार आहे. तो सात्त्विक आणि आरोग्यवर्धक आहार आहे. शाकाहारापेक्षा मांसाहार जास्त ऊर्जा वाढवणारा असतो हा गैरसमज आहे. ''जर तुम्ही शाकाहारी अन्न खाल्ले तर तुम्हाला जीवनऊर्जा मिळेल; परंतु जर तुम्ही मांस खाल्ले तर ते मेलेले अन्न तुम्हाला मृत बनवेल.'' मानव आणि इतर प्राणी/वनस्पती यांच्यातील संबंध दयाळूपणा, प्रेम आणि परस्परसंबंधांवर आधारलेले आहेत. एक महत्त्वाचे सूत्र महावीरांनी दिले, सूक्ष्म जीवांपासून ते महाकाय प्राण्यांपर्यंत - 'परस्परोपग्रहो जीवानाम्' हेच पर्यावरणशास्त्राचे सत्य आहे. वनस्पती-प्राण्यांनाही भावना असतात. म्हणजे संगीत चालू असेल तर वनस्पती/प्राण्यांनाही आनंद होतो, तेच फटाके वाजले तर ते घाबरतात, थरथर कापतात.



स्वार्थासाठी मनुष्य जंगलतोड करू लागला. यामुळे आज आपण बघतो जंगलातील प्राणी आज आपल्याला शहरांमध्ये दिसायला लागले आहेत. एकीकडे वाढत जाणारी लोकसंख्या आणि दुसरीकडे वाढत जाणारी हिंसा यामुळे पृथ्वीचा समतोल ढासळला आहे. उष्माघात, वाढत असणारे तापमान, प्रदूषण यामुळे आरोग्याच्या विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. मांसाहार बंद केला तर अन्नधान्य, फळे, भाजीपाला यांचे भाव गगनाला भिडतील, अशी शंका अनेकदा उपस्थित केली जाते. पशु-पक्षी इतके वाढतील की त्यांना निवारा आणि अन्नधान्य मिळणार नाही, यावर उपाय काय? अर्थशास्त्रज्ञ माल्थस यांच्या मते, निसर्ग स्वतःच अन्नपदार्थ आणि लोकसंख्या यांच्यातील संतुलन राखतो. जर मानवाने लोकसंख्या अनियंत्रित वाढू दिली, तर निसर्ग महामारी/आपत्तींमधून समतोल राखतो.

### 'जिओ और जिने दो'

'जगा आणि जगू द्या' हा महत्त्वाचा संदेश महावीरांनी विश्वाला दिला. भगवान महावीरांचे निसर्गाशी अतूट नाते होते. त्यांनी केवळ प्राण्यांमध्येच नव्हे तर जंगलातील झाडाझुडपांमध्येही राहून आध्यात्मिक साधना केली आणि ऋजुवाटिका नदीच्या जवळील सालच्या झाडाखाली बसून आत्मज्ञान (केवळ ज्ञान) प्राप्त केले. जैन धर्माच्या पवित्र ग्रंथांमध्ये (आगम) केवळ प्राणीच नव्हे तर झाडे आणि वनस्पतींशीही दयाळूपणे वागण्याचा सल्ला देण्यात आला आहे. पृथ्वी (माता), पाणी, हवा, वनस्पती आणि अग्नी हे सर्व जीव आहेत. ते सर्व मिळून एक वातावरण तयार करतात आणि संतुलन राखण्यासाठी एकमेकांवर प्रभाव टाकतात. कोणत्याही एका घटकाच्या असंतुलनाचा परिणाम पर्यावरणावर होतो. प्रत्येकाला नवीन आणि विनाशकारी गोष्टींपासून संरक्षण आवश्यक आहे. संसाधनांच्या अति वापरामुळे नैसर्गिक संसाधने नष्ट होतात, ज्यामुळे पाणी, हवा आणि निसर्गाचे प्रदूषण होते. म्हणून भगवान महावीर म्हणाले की, पृथ्वी, पाणी इत्यादीवरील हिंसेचे परिणाम जाणून विवेकी माणसाने त्यांच्यावर हिंसा करू नये, इतरांवर हिंसा करण्यासाठी धावून जाऊ नये किंवा हिंसा करणाऱ्यांना मान्यता देऊ नये. जो पृथ्वी, पाणी इत्यादींवर हिंसा करतो, तो त्यांच्यावरच हिंसा करतो असे नाही तर त्यांच्यावर अवलंबून असलेल्या अनेक जीवांवरही हिंसा करतो. सर्व प्राणिमात्रांच्याप्रती मैत्रीभाव ठेवणे यावर त्यांनी सांगितले आहे, ''मित्ति मे सव्व भू देसु। वैरं मज्झणम् केणवि।'' म्हणजेच सर्व प्राण्यांशी माझी मैत्री राहो, वैर न राहो कोणाशी.

ज्या आंतरिक गुणांच्या सामर्थ्यावर महावीरांनी नैतिक धारणा व व्यावहारिक जीवन यांचा समतोल घडवून आणला, त्याला आजही तोड नाही. ही बाब अत्यंत लक्षणीय आहे. त्यामुळे भारतामध्ये व लोकजीवनामध्ये सामाजिक अखंडत्व राहिले. म्हणूनच अलंकाराने मुक्त, क्षमेने युक्त, निर्लोभी, सत्य, संयम आणि त्यागाची परमावधी असलेले जीवन जगणारे भगवान महावीर स्वामी 'पर्यावरण रक्षक' म्हणून ओळखले जातात.

**लेखिका 'इंडिया फाउंडेशन'च्या संस्थापक आहेत.**

---

## जनसुरक्षा कायदा हा देशांतर्गत सुरक्षेसाठी महत्त्वाचा : फडणवीस

मुंबई, ता. ९ : राज्य सरकारने प्रस्तावित केलेला विशेष जनसुरक्षा कायदा हा देशांतर्गत सुरक्षेसाठी महत्त्वाचा आहे. या कायद्यामुळे पत्रकार किंवा कोणत्याही सर्वसामान्य व्यक्तीला कोणताही त्रास होणार नाही, त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बाधा पोहोचणार नाही. हा कायदा व्यक्तींसाठी नसून देशविघातक कृत्ये करणाऱ्या संघटनांविरुद्ध असल्याची निःसंदिग्ध ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (ता. ९) दिली. मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेनंतर पत्रकार संघटनांच्या प्रतिनिधींनी समाधान व्यक्त केले.



जनसुरक्षा कायद्यासंदर्भात जनतेमध्ये स्पष्टता यावी, यासाठी विधिमंडळात कायद्याचा प्रस्ताव मांडतानाच तो संयुक्त समितीकडे पाठवून त्याबद्दल जनसुनावणी घेण्याची भूमिका मांडली. या प्रस्तावित कायद्यामध्ये पत्रकार संघटनांच्या काही सूचना असतील तर त्यावरही योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच कायद्यातील तरतुदीत स्पष्टता येण्यासाठी योग्य ती काळजी घेण्यात येईल.

- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

जनसुरक्षा कायद्यासंदर्भात विविध पत्रकार संघटनांच्या प्रतिनिधींबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृहात आयोजित बैठकीत चर्चा करून पत्रकारांच्या शंकांचे निरसन केले. या वेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, माहिती व जनसंपर्क प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला व पत्रकार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी फडणवीस म्हणाले. की देशात यापूर्वीच तेलंगणसह इतर चार राज्यांनी तसेच केंद्र शासनाने जनसुरक्षा कायदा केला आहे. या चार राज्यांपेक्षा महाराष्ट्र शासनाने केलेला कायदा हा अधिक संरक्षित आहे. अनेक माओवादी संघटनांना देशातील अनेक भागांत बंदी आहे. त्यामुळे या संघटनांनी महाराष्ट्रात त्यांचे मुख्यालय हलविले आहे. माओवादी संघटनांच्या फ्रंटल ऑर्गनाझेशन आता शहरी भागात राहून कार्य करीत आहेत. त्यामुळे आता जर हा कायदा केला नाही तर भविष्यात अनेक अडचणींना महाराष्ट्राला सामोरे जावे लागेल.

## मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांचे बनावट वेळापत्रक व्हायरल

मुंबई, ता. ९ : राज्यात विविध विद्यापीठांच्या बनावट पदवी प्रमाणपत्रांची प्रकरणे गाजत असताना, आता सोशल मीडियावर मुंबई विद्यापीठाच्या विविध परीक्षांचे बनावट वेळापत्रक व्हायरल झाले आहे. ही बाब लक्षात येताच विद्यापीठाने व्हायरल होत असलेले वेळापत्रक बनावट असल्याचे जाहीर केले आणि विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जारी केलेल्या वेळापत्रकावरच विश्वास ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

मुंबई विद्यापीठाच्या पाचवर्षीय विधीच्या १०व्या सत्राच्या परीक्षेचे बनावट वेळापत्रक सर्वत्र वायरल झाले होते. त्यात विविध परीक्षांच्या तारखा, वेळांची माहिती विद्यापीठाच्या लोगोसह देण्यात आली. त्यावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ. पूजा रौंदळे यांनी तत्काळ खुलासा करीत ही परीक्षा १६ एप्रिल ते ५ मे या कालावधीत घेतली जाईल. त्यामुळे सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या अनधिकृत माहितीवर विश्वास ठेवू नका, असे आवाहन त्यांनी केले.

## नौदलासाठी २६ राफेल विमाने

पान १ वरून

स्वाक्षऱ्या केल्या जाणार आहेत. आयएनएस विक्रांत, आयएनएस विक्रमादित्य यांसारख्या लढाऊ जहाजांवर राफेलची तैनाती केली जाणार आहे. वरील दोन्ही जहाजांवर सध्या तैनात असलेली मिग २९-के ही विमाने जुनी झाली आहेत. राफेल विमानांची देखभाल, लॉजिस्टिक पाठबळ, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण याची जबाबदारी फ्रान्सची असेल. विशेष म्हणजे, या विमानांचे सुटे भाग आणि उपकरणांची निर्मिती भारतात केली जाणार आहे.

### विमानांची वैशिष्ट्ये

आधुनिक तंत्रज्ञान, शस्त्रास्त्र यंत्रणा आणि लढाईतील कुशलतेसाठी राफेल विमाने प्रसिद्ध आहेत. नौदलाच्या गरजा लक्षात घेऊन या विमानांची निर्मिती करण्यात आली आहे. यात मजबूत लँडिंग गिअर, अरेस्टर हुक्स आणि शॉर्ट टेक ऑफ बट अरेस्टेड रिकव्हरी (स्टोबार) प्रणालीचा समावेश आहे. विमानाचे एअरफ्रेमदेखील विशिष्ट पद्धतीचे आहे. जहाजांवरील धावपट्टी छोटी असते. त्यामुळे उड्डाण आणि लँडिंगच्या दृष्टीने 'स्टोबार' प्रणालीचा अवलंब केला जातो. हवाई दलाच्या अंबाला आणि हाशिमारा तळावर ३६ राफेल विमाने आधीपासून तैनात आहेत. भारताने २०१६ मध्ये विमाने खरेदी केली आहेत.



### पाणबुड्यांचीही बांधणी सुरू

संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण खरेदी परिषदेच्या (डीएसी) गतवर्षीच्या सप्टेंबरमध्ये झालेल्या बैठकीत राफेल-एम विमाने खरेदी करण्याच्या अनुषंगाने नियमांत आवश्यक त्या सुधारणा झाल्या होत्या. नौदलाच्या ताफ्यात सध्या ४० मिग २९-के विमाने आहेत. रशियाकडून या विमानांची खरेदी करण्यात आली होती. यासाठी सरकारला दोन अब्ज डॉलर इतका खर्च आला होता. फ्रान्सकडून स्कॉर्पिन वर्गातील तीन अतिरिक्त पाणबुड्या खरेदी करण्याचा करार करण्यात आला आहे. माझगाव डॉकमध्ये या पाणबुड्यांची बांधणी सुरू आहे.

## राज्यसेवा परीक्षा निकालात गोंधळ

### जास्त गुण असूनही विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीत स्थान नाही

**प्रज्वल रामटेके : सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. ९ : रात्री सगळे गाढ झोपले होते, पण एका खोलीत अजूनही उजेड होता. डोळे थकलेले, पण मन सतत म्हणत होतं...'थोडं अजून वाच... उद्या तू अधिकारी होणार आहेस', अशाच अनेक रात्री जागून अभ्यास करून राज्यसेवेची परीक्षा दिली. परीक्षा झाल्यावर आत्मविश्वास होता की, लिहिलेली उत्तरे बरोबर आहेत. गुण चांगले मिळतील आणि यंदा गुणवत्ता यादीमध्ये नक्की नाव असेल. मात्र जेव्हा यादी पाहिली तेव्हा पायाखालची जमीनच सरकली. कटऑफपेक्षा जास्त गुण असूनदेखील यादीमध्ये नाव नाही. हा फक्त धक्का नव्हता, तर अनेक वर्षांपासून करत असलेली मेहनत, पाहिलेल्या स्वप्नांचा अंत होता, अशी भावना स्पर्धा परीक्षेच्या एका उमेदवाराने व्यक्त केली.

राज्यसेवाची पूर्व परिक्षा १ डिसेंबर २०२४ रोजी पार पडली. या परीक्षेचा निकाल १२ मार्च रोजी जाहीर करण्यात आला. या गुणवत्ता यादीमध्ये कटऑफपेक्षा जास्त गुण असूनदेखील अनेक विद्यार्थ्यांची नावे या यादीमध्ये नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. याविषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधला असता, नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर त्यांनी सांगितले की, ''ऑप्टिकल मार्क रिकग्निशन (ओएमआर) शीट तपासून पाहिली. तेव्हा कटऑफपेक्षा जास्त गुण असल्याचे स्पष्ट झाले. मात्र निकाल पाहिल्यानंतर गुणवत्ता यादीमध्ये नाव नाही आले.'' यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सचिव डॉ. सुवर्णा खरात यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.


**BRIC | NCCS**
a DBT Organization

**राष्ट्रीय कोशिका विज्ञान केन्द्र, पुणे, महाराष्ट्र**
**National Centre For Cell Science, Pune, Maharashtra**

**पीएच.डी. प्रवेश - ऑगस्ट 2025**

बायोटेक्नॉलॉजी रिसर्च अ‍ॅण्ड इनोव्हेशन कौन्सिल - नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्स (बीआरआयसी -एनसीसीएस) ही भारतातील एक आघाडीची संशोधन संस्था आहे. सेल व मॉलेक्युलर बायोलॉजी, स्ट्रक्चरल बायोलॉजी, बायोइन्फॉर्मेटिक्स, सिस्टिम्स बायोलॉजी, न्यूरोसायन्स, इम्युनोलॉजी, इन्फेक्शन बायोलॉजी, कॅन्सर बायोलॉजी, मायक्रोबियल इकॉलॉजी आणि इतर संबंधित क्षेत्रांमध्ये जैवतंत्रज्ञान संशोधनातील आघाडीचे विषय अभ्यासण्यास इच्छुक पीएच.डी. उमेदवारांकडून अर्ज मागवले जात आहेत.

जीवशास्त्र संशोधन करण्यासाठी ज्यांच्यामध्ये प्रबळ इच्छा आहे, अशा उमेदवारांनी अर्ज करावा. बीआरआयसी – एनसीसीएस मध्ये सामील व्हा आणि अत्याधुनिक सुविधा असलेल्या आघाडीच्या संशोधनात भाग घ्या. .या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी जगभरातील नामांकित संस्थांमध्ये यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय परिषदा आयोजित करण्यासाठी व उपस्थित राहण्यासाठी बीआरआयसी – एनसीसीएस कडून प्रोत्साहन आणि आर्थिक मदत दिली जाते.

आपल्या संशोधन क्षमतेची प्रगती करा– बीआरआयसी – एनसीसीएस मध्ये आजच अर्ज करा!

अधिक माहितीसाठी — डीन, शैक्षणिक विभाग

क्यूआर कोड स्कॅन करा किंवा खालील लिंकला भेट द्या:
https://www.nccs.res.in/Career/1
अर्ज करण्याची शेवटची तारीख: 13.05.2025



**महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय**
(संसदेद्वारे मंजूर कायदा १९९७ चे कलम ३ अंतर्गत स्थापित केंद्रिय विश्वविद्यालय)
पोस्ट हिंदी विश्वविद्यालय, गांधी हिल्स, वर्धा- ४४२००१ (महाराष्ट्र)
दूरध्वनी क्र.: ०७१५२-२३०९०१, संकेतस्थळ : www.hindivishwa.org

**शिक्षकेतर पदांसाठी सूचना**
**(कुलसचिव, वित्त अधिकारी आणि परीक्षा नियंत्रक)**

Advt. No. MGAHV/03/2025 — दिनांक : २५-०३-२०२५

विद्यापीठामध्ये प्रत्यक्ष भरतीअंतर्गत/प्रतिनियुक्ती तत्त्वावर खालील पदे भरण्यासाठी विद्यापीठाच्या संकेत-स्थळाद्वारे विहित स्वरूपात पात्र भारतीय नागरिकांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पद कोड | पदाचे नाव | ७ व्या सीपीसीनुसार वेतनश्रेणी | | पदांची संख्या | पदाची वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | पे लेव्हल | वेतन श्रेणी | | |
| १ | कुलसचिव | लेव्हल-१४ | रु. १,४४,२००-२,१८,२०० | ०१ | यूआर |
| २ | वित्त अधिकारी | लेव्हल-१४ | रु. १,४४,२००-२,१८,२०० | ०१ | यूआर |
| ३ | परीक्षा नियंत्रक | लेव्हल-१४ | रु. १,४४,२००-२,१८,२०० | ०१ | यूआर |

ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक एम्प्लॉयमेंट न्यूज/रोजगार समाचारपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकापासून २१ (एकवीस) दिवस आहे. या संबंधित शुद्धिपत्रक काही असल्यास, फक्त विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध होईल. **ऑनलाईन अर्ज भरण्यासाठीची लिंक एम्प्लॉयमेंट न्यूज/रोजगार समाचारपत्राध्ये जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकापासून उपलब्ध राहील.**

**ऑनलाईन अर्जाचे सादरीकरण करणे आवश्यक आहे.** आवश्यक कागदपत्रांसह अर्जाच्या हार्ड कॉपी आणि कार्यरत अर्जदाराद्वारे अ‍ॅडव्हान्स कॉपी पोस्टाद्वारे विद्यापीठाकडे (फक्त रजिस्टर्ड/स्पीड पोस्टाद्वारे) ऑनलाईन अर्ज सादरीकरणाच्या अंतिम दिनांकापासून १० दिवसांच्या आत पाठवाव्यात. अर्हता, वय, अनुभव, सेवा शर्ती, मानधन, आवश्यक अर्हता आणि अर्ज/प्रक्रिया शुल्क इत्यादींच्या संबंधित तपशिलासाठी कृपया विद्यापीठाचे संकेतस्थळ www.hindivishwa.org येथे भेट द्या.

CBC 21207/12/0001/2526 — **कुलसचिव**



**हुहत्माकी इंडिया लिमिटेड**
(CIN No. L21011MH1950FLC145537)
**नोंदणीकृत कार्यालय :** ७ वा मजला, बेलोना, दि वॉक, हिरानंदानी इस्टेट, घोडबंदर रोड, ठाणे, महाराष्ट्र - ४०० ६०७. **दूरध्वनी क्र. :** +९१ (२२) ६१७४ ०१००
**संकेतस्थळ :** www.flexibles.huhtamaki.in
**ई-मेल पत्ता :** investor.communication@huhtamaki.com

**व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (VC)/इतर दृकश्राव्य माध्यम (OAVM) आणि रेकॉर्ड डेटद्वारे होणारी वार्षिक सर्वसाधारण सभा**

कंपनीच्या सभासदांना याद्वारे सूचना देण्यात येते की, सेबी परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CFD-PoD-2/P/CIR/2024/133 दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ आणि मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (एमसीए) द्वारे जारी सर्व लागू परिपत्रकांसह आणि याबाबतीत जारी (एमसीए परिपत्रक) इतर परिपत्रके आणि सर्वसाधारण परिपत्रक क्र. २०/२०२० दिनांक ०५ मे २०२०, सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०९/२०२४, दिनांक १९ सप्टेंबर २०२४ सह वाचावा सभेच्या सूचनेमध्ये स्थापित व्यवसायांचे व्यवहार करण्यासाठी कंपनीची ७५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (AGM) **गुरुवार, ०८ मे २०२५ रोजी दुपारी ०२.३० वा. (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (VC)/इतर दृकश्राव्य माध्यमाद्वारे (OAVM) होणार आहे.**

सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की :

- वरील परिपत्रकाच्या अनुपालनामध्ये, एजीएम सूचनेच्या इलेक्ट्रॉनिक्स प्रती आणि वार्षिक अहवाल २०२४ सर्व भागधारकांना पाठविण्यात येईल ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/ डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे नोंदणीकृत आहेत आणि **कंपनीने भागधारकांना एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवालाच्या प्रत्यक्ष प्रती पाठविल्या नाहीत.**
- भागधारकांकडे डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात भाग आहेत आणि ज्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत नाहीत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटद्वारे त्यांच्या संबंधित डिपॉझिटर्ससह त्यांचे ई-मेल पत्ते आणि मोबाईल क्रमांक नोंदणीकृत करावेत.
- ज्या सभासदांकडे समक्ष स्वरूपात भाग आहेत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांचे होल्डींग्ज डिमटेरिअलाईज्ड करावेत किंवा त्यांचे ई-मेल पत्ते आणि मोबाईल क्रमांक नोंदणीकरणासाठी कागदोपत्री पत्ता आणि संबंधित आयडीसह संबंधित गुंतवणुकदार सेवा विनंती अर्ज (ISR-1 आणि ISR-2) सादर करावा आणि लाभांश प्राप्तीसाठी त्यांचे बँक तपशील कंपनीचे निबंधक आणि भाग हस्तांतरण प्रतिनिधी **MUFG इन टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडसह** (पूर्वीचे नाव लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) अद्ययावत करावेत. वरील फॉर्म कंपनीचे आरटीए संकेतस्थळ https://in.mpms.mufg.com/ वर उपलब्ध आहेत.
- भागधारकांकडे डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात भाग असल्यास, त्यांना त्यांचे बँक/ECS तपशील जेथे लागू असेल तेथे, त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपटद्वारे लाभांशाच्या प्राप्तीसाठी अद्ययावत करण्याची विनंती करण्यात येत आहे.
- जर अगोदर केले नसल्यास, सर्व भागधारकांना त्यांचे KYC तपशील अद्ययावत करण्याची विनंती करण्यात येत आहे.

इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे एजीएमच्या सूचनेमध्ये स्थापित व्यवसायांच्या व्यवहारांवर एजीएमदरम्यान किंवा एजीएमपूर्वी त्यांचे मतदान रिमोटली करण्याची संधी भागधारकांना मिळाली आहे. डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात, प्रत्यक्ष स्वरूपात भागधारक धारण करीत असलेल्या भागांसाठी एजीएम दरम्यान किंवा एजीएमपूर्वी रिमोटली मतदानाची पद्धती आणि भागधारक ज्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांना भागधारकांच्या सूचनेमध्ये पुरविण्यात येतील.

७५व्या एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल २०२४ कंपनीचे संकेतस्थळ www.flexibles.huhtamaki.in, स्टॉक एक्स्चेंजचे संकेतस्थळ www.bseindia.com आणि www.nseindia.com आणि NSDL चे संकेतस्थळ www.evoting.nsdl.com वर सुद्धा उपलब्ध आहे.

कंपनी कायदा २०१३ चे कलम ९१ च्या तरतुदींच्या अटीमध्ये आणि त्याअंतर्गत लागू नियमांनुसार, मंडळाद्वारे सुचविण्यात आलेल्यानुसार, आर्थिक वर्ष ३१ डिसेंबर २०२४ साठी लाभांश देयकाच्या हेतूसाठी **रेकॉर्ड दिनांक** म्हणून **गुरूवार २४ एप्रिल २०२५** कंपनीने निश्चित केला आहे. एजीएममध्ये लाभांश मंजूर झाल्यानंतर एजीएमच्या ३० दिवसांमध्ये अशा सभासदांना देण्यात येईल ज्यांनी KYC पूर्ण केले आहे आणि ज्यांची नावे गुरूवार, २४ एप्रिल २०२५ रोजी कंपनी सभासदांच्या रजिस्टरमध्ये दिसत आहेत.

आयकर कायदा १९६१ च्या तरतुदीनुसार (दि आयटी अ‍ॅक्ट), वेळोवेळी सुधारीत आणि वित्त कायदा २०२०, ०१ एप्रिल २०२० पासून लागू तरतुदींसह वाचावा, सभासदांच्या हातामध्ये येणारी लाभांश रक्कम करपात्र असते आणि लागू दरांनुसार, कंपनीला सभासदांना लाभांशाची रक्कम करवजावटीच्या स्रोतावर (TDS) देणे आवश्यक आहे. **आर अँड टी प्रतिनिधी /डिपॉझिटरी पार्टिसिपंटसोबत आधारसह त्यांचे वैध लिंक्ड् पॅनकार्ड अद्ययावत करण्याची विनंती भागधारकांना करण्यात येत आहे.** जर आर्थिक वर्ष २०२५-२६ दरम्यान निवासी वैयक्तिक भागधारकाचे लाभांश उत्पन्न ₹ १०,००० पेक्षा जास्त नसल्यास टीडीएसची वजावट होणार नाही. याबाबरचा ई-मेल संबंधित भागधारकांना अगोदरच पाठविण्यात आलेला आहे.

सेबी त्यांचे परिपत्रके दिनांक ३ नोव्हेंबर २०२१ नुसार (पाठोपाठची सुधारीत परिपत्रके दिनांक १४ डिसेंबर २०२१, १६ मार्च २०२३ आणि १७ नोव्हेंबर २०२३) सिक्युरिटी होल्डर्स आवश्यक केली आहेत (समक्ष स्वरूपामध्ये सिक्युरिटीज धारण करणारांसाठी) ज्यांच्या फोलिओमध्ये पॅन किंवा नामांकनाची निवड किंवा संपर्क तपशील किंवा मोबाईल क्रमांक किंवा बँक खात्याचे तपशील किंवा नमुना स्वाक्षरी अद्यायवत केलेली नाही अशा फोलिओच्या संबंधात लाभांश, व्याज किंवा पूर्तता यासह कोणत्याही पेमेंटसाठी केवळ १ एप्रिल २०२४ पासून इलेक्ट्रॉनिक पर्यायाद्वारे संपूर्णमध्ये त्यांचे वर नमूद तपशील सादर केल्यानंतर पात्र असेल.

वरील सर्व तपशील संपूर्णपणे सादर केल्यावर वरील माहिती एमसीए परिपत्रकांसह अनुपालनामध्ये आणि कंपनीच्या सभासदांच्या लाभासाठी आणि माहितीसाठी जारी करण्यात आलेली आहे.

**संचालक मंडळाच्या आदेशान्वये**
**हुहत्माकी इंडिया लिमिटेडकरिता**

९ एप्रिल २०२५ — **अभिजात सिन्हा**
मुंबई — कंपनी सचिव



**माळेगाव बु. नगरपंचायत, जिल्हा पुणे**
**जाहीर ई-निविदा सूचना**
**सन २०२५-२६**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत माळेगाव बु. (ता. बारामती, जि. पुणे) शहराच्या पाणीपुरवठा योजनेचे काम करणे. या कामाची ई-निविदा माळेगाव बु. नगरपंचायतकडून मागविणेत येत आहे. कामाची अंदाजित र. रु. ८०,३१,३०,१२९/- इतकी असून सदर निविदेमधील तपशीलवार पूर्व पात्रता निकष, आवश्यक दस्तऐवज व शुद्धिपत्रक हे **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक ११/०४/२०२५ पासून ते दिनांक ०१/०५/२०२५ पर्यंत उपलब्ध असेल.

**जा. क्र. ६३३/२०२५**
**दि. ०९/०४/२०२५**

स्वा/-
**(बालाजी लोंढे)**
मुख्याधिकारी
माळेगाव बु. नगरपंचायत, ता. बारामती, जिल्हा पुणे



**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**
म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना क्र. का.अ. (पूर्व) / मुं. झो.सु. मंडळ/ई-निविदा/मससंम/०४/२०२५-२६**

कार्यकारी अभियंता [पूर्व] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५२५१) हे जिल्हा उप निबंधक/पूर्व/मुंबई उपनगरे जिल्हा यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकुण **०२** कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. विस्तृत निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर **https://mahatenders.gov.in** उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक ११.०४.२०२५ दुपारी ०३.०५ पासून दिनांक १७.०४.२०२५ सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास **https://mahatenders.gov.in** संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व), मुं. झो. सु. मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

Follow us: @mhadaofficial

सही/-
**कार्यकारी अभियंता (पूर्व),**
**मुं. झो. सु. मंडळ, मुंबई**

**CPRO/A/279**
म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था



**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**लो. टि. म. सा. रुग्णालय, सायन, मुंबई- ४०००२२.**
**क्र. LTH/10/G, Dtd. 09.04.2025**

**महाटेंडर नोटीस**

ही महाटेंडर नोटीस आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे (बृ. मुं. मनपा) आयुक्त खाली दर्शविल्याप्रमाणे तीन पॅकेट प्रणालीतून महाटेंडर आमंत्रित करीत आहेत.
कामाचे वर्णन : लो. टि. म. सा. रुग्णालयाकरिता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार.

| अ. क्र. | विवरण | महाटेंडर शुल्क (रु.) | इरठे (रु.) | ऑनलाइन बोली डाऊनलोडिंग प्रारंभ दिनांक व वेळ | ऑनलाइन बोली सादरीकरणाचा अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | स्क्रू समवेत पॉलीथिलिन ट्रान्सपरन्ट बॉटल. क्षमता १.५ लिटर.<br>स्क्रू समवेत पॉलीथिलिन ट्रान्सपरन्ट बॉटल. क्षमता २.० लिटर.<br>स्क्रू समवेत पॉलीथिलिन ट्रान्सपरन्ट बॉटल. क्षमता २०० मिली<br>2025_MCGM_1167006_1 | रु. १,४५२/- + १८% जीएसटी | रु. २०,०००/- | दि. ०९.०४.२०२५ रोजी सायं. ६.०० वा. (१८.०० वा.) | दि. १६.०४.२०२५ रोजी सायं. ६.०० वा. (१८.०० वा.) |
| २. | नेब्यूलायझर पोर्टसमवेत एनआयव्ही / सीपीएपी फेस मास्क, मोठ्या व मध्यम आकाराचे.<br>2025_MCGM_1167059_1 | रु. ३,६३०/- + १८% जीएसटी | रु. ४०,०००/- | | |
| ३. | अग्फा ड्राय स्टार फिल्म्स् (टीडी२बी) साइज १४" X १७"<br>2025_MCGM_1168911_1 | रु. ३,६३०/- + १८% जीएसटी | रु. ४०,०००/- | | |
| ४. | अग्फा ड्राय स्टार फिल्म्स्. साइज १० X १२".<br>2025_MCGM_1168907_1 | रु. ३,६३०/- + १८% जीएसटी | रु. ४०,०००/- | | |

इच्छुक निविदाकारांनी निविदेच्या पुढील तपशिलाकरिता महानगरपालिकेची वेबसाइट http://www.mcgm.gov.in येथे भेट द्यावी.
निविदा दस्तावेज टपालाद्वारे वितरीत वा स्वीकृत केले जाणार नाहीत.

सही/-
**उप अधिष्ठाता**
**लो. टि. म. सा. रुग्णालय, सायन**

**पीआरओ/९५/जाहि./२०२५-२६**